RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY
"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Universities Act, 1994.)"

**Office of the Controller of Examinations**
**(Ph.D. Cell)**
**Examination Bhawan, Laxminarayan Institute of Technology Premises,**
**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur-440033**

No. RTMNU/Ph.D. Cell./2016/ 2826 Dated : 29/01/2016

# अधिसूचना

**विषय: संशोधक, मार्गदर्शक आणि संशोधन स्थळासंदर्भात आवश्यक सुचना**

विद्यापीठीय कार्यालयीन कामकाजात गती, कार्यक्षमता आणि पारदर्शकता आणण्याच्या दृष्टिकोणातून आचार्य पदवी कक्षाची कामे संगणकीकृत करून ऑनलाईन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. यातील पहिला टप्पा म्हणून दिनांक १५ जानेवारी २०१६ पर्यंत आचार्य नोंदणी आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने बोलविण्यात आलेले होते व त्याची प्रिंट कॉपी मार्गदर्शकांची, संशोधन स्थळ प्रमुखांची स्वाक्षरी घेवून आवश्यक कागदपत्रे संलग्न करून आराखडयाची सात प्रती संलग्न करून आचार्य पदवी कक्षात सादर करण्याची सुचना देण्यात आलेली होती.

उपरोक्तनुसार खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे :

१) ऑनलाईन पध्दतीने आवेदन करण्या–या सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, मार्गदर्शकाकडे आणि संशोधन स्थळामध्ये उपलब्ध असलेल्या जागांची माहिती **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर **Information Regarding Students, Supervisor and Place of Research for Ph.D. Course** या नावे उप–संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीच्या आधारे ज्या विद्यार्थ्यांनी संशोधन स्थळामध्ये जागा नसलेल्या संशोधन स्थळामार्फत किंवा ज्या मार्गदर्शकाकडे ८ पेक्षा जास्त संशोधकांची नोंदणी झालेली असेल अशा मार्गादर्शकामार्फत आवेदन सादर केले असतील असे संशोधक 'आचार्य पदवी नोंदणी' पासून वंचित राहू नये व त्यांचे संशोधन कार्य व शैक्षणिक हित बाधित होवू नये यादृष्टिकोणातून अश्या विद्यार्थ्यांना ज्या संशोधन केंद्रावर जागा उपलब्ध असेल त्या संशोधन केंद्रामार्फत अर्ज सादर करण्याची एक संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२) उपरोक्त संधी फक्त त्याच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे ज्यांनी दिनांक १५ जानेवारी, २०१६ पर्यंत ऑनलाईन आवेदन सादर केलेले आहेत हया विद्यार्थ्यांनी आपले संशोधन स्थळ किंवा मार्गदर्शक बदलवावयाच्या असल्यास त्या संबंधीचा लेखी अर्ज दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ पर्यंत उपकुलसचिव, आचार्य पदवी कक्ष, परीक्षा भवन, लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था परिसर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, अमरावती रोड, नागपूर–४४००३३ हयांच्या नावे नविन संशोधन स्थळ प्रमुख व मार्गदर्शक हयांचे संमतीपत्र स्वाक्षरीनिशी जोडून सादर करावे.

३) निर्धारित तारखेपर्यंत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सुधारित अर्ज प्राप्त न झाल्यास पूर्वी प्राप्त झालेला आवेदनपत्रामध्ये नमूद केलेल्या संशोधक स्थळावर किंवा मार्गदर्शकाकडे जागा रिक्त नसल्यास अश्या स्वरूपाचे अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही व त्यावर कोणताही विचार करण्यात येणार नसून त्यासंदर्भात कोणताही आक्षेप स्विकारण्यात येणार नाही व सदर आवेदन आपोआप रद्द समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

४) मार्गदर्शकाकडे संशोधन करीत असलेल्या संशोधकांची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली असून. सर्व संबधित मार्गदर्शकांना विंनती करण्यात येते की, प्रकाशित यादीमध्ये काही दुरूस्ती असल्यास (जसे– काही विद्यार्थ्यांचे नांव सुटुन गेले असतील तर त्यांच्या समावेश करण्याबाबत किंवा ज्यांना आचार्य पदवी जाहिर झालेली असेल त्यांच्या नाव यादीतून रद्द करण्याबाबत) त्यांनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत आचार्य पदवी कक्षात लेखी स्वरूपात कळवावे.

५) संशोधन स्थळ प्रमुखांना विनंती करण्यात येते की, संशोधन स्थळ म्हणून मान्यता पत्रात संशोधन स्थळामध्ये प्रवेश क्षमता निर्धारित करण्यात आलेली आहे. मान्यता प्राप्त संशोधन स्थळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची तात्पुरत्या स्वरूपाची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये काही दुरूस्ती असल्यास अद्यावत माहिती दिनांक ५ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत आचार्य पदवी कक्षात लेखी स्वरूपात सादर करावे.

(डॉ. निरज खटी)
परीक्षा नियत्रंक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर.